## <u>रे. मु. नं.२५९/२०१३ मधील नि.क्र.३८ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज वादींनी वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने कथन असे की, वादी नं.1 हा दि.२९.११.२०१३ रोजी मंगळापुर, ता.संगमनेर येथे मयत झालेला आहे. सबब, वादी क्र.1 यांचे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी या अर्जास हरकत घेतली की, अर्ज मुदतीत नाही. सबब, अर्ज रदद करण्याची विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादींतर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा मनाई हुकूसाठी दाखल केला असुन मयत वादी क्र.1 याचे वारस दाव्याच्या अंतिम निकालासाठी आवश्यक पक्षकार आहेत. सबब, न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

सदरचा अर्ज खर्च रक्कम रू.१००/- सह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम रक्कम वादींनी प्रतिवादींना द्यावी.

वादींनी प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे योग्य ती दुरूस्ती मुळ दाव्याकामी मुदतीच्या आत करावी व दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/-
(के.पी.जैन देसरडा)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर.

दि.१६/९/२०१६